# <u>किरकोळ दि. अर्ज ३७/२०१६ मधील निशाणी १३ व १५ खालील आदेश</u>

CNR NO. - MHST14-001497-2016

अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभयपक्षाचा युक्तिवाद ऐकला.

२) अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत जाबदार नं. ३ याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी करिता दाखल केलेला आहे.

३) दरखास्तदार यांचे अर्जातील थोडक्यात कथन असे की, जाबदार नं. ३ संभाजी बाबूराव बेलदार यांचा दि. १३.०२.२०१७ रोजी मृत्यू झालेला आहे. सदर मयत जाबदार यांचे वारसांना अर्जाच्या कामी वारस म्हणून समाविष्ठ करणे अर्जाच्या अंतिम निर्णयाच्या दृष्टीने आवश्यक आहे. अर्जदार हे सतत आजारी व वयस्कर असल्यामुळे त्यांना वारस अभिलेखावर घेण्यास ४४ दिवसांचा विलंब झालेला आहे. सबब, अर्जदार यांना मयत जाबदार नं. ३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ४४ दिवसांचा विलंब माफ होवून वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी ही विनंती.

४) याउलट मयत जाबदार नं. ३ यांचे वारसांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे देवून अर्जास तीव्र विरोध दर्शविलेला आहे. अर्जदार यांनी अर्जात दिलेले कारण खोटे व वस्तूस्थितीचा विपर्यास्त करणारे आहे. तसेच, मयत जाबदार नं. ३ यांचे वारसांपैकी चंद्रभागा रावसो यजगर हि मुलगी दि. २१.४.२००६ रोजी मयत असल्याची सदर अर्जदार यांना एक महिन्यापूर्वी समजले. या बाबीचा विचार करता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ मधील नियम १ व २ अन्वये मयत व्यक्तीचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यास मयत व्यक्ती बाबत अर्ज अपोआप ॲबेट झाला असे कायदयाचे गृहीतक असल्याने अर्ज फेटाळण्यात यावा ही विनंती.

५) अर्जातील कथने, जाबदार नं. ३ चे वारसांचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. जाबदार नं. ३ यांचा मृत्यू दि. १३.२.२०१७ रोजी झाला असल्याचे व त्यांच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांना अर्जामध्ये समाविष्ठ केले नसल्याचे दिसून येते. प्रस्तूतच्या अर्जामध्य वाटपाचा दावा रे.दि.मु.नं. २३/८६ मध्ये झालेल्या हुकूमनाम्या

मध्ये दुरूस्ती करणे करिता दाखल केलेला आहे. जाबदार नं. ३ हा मयत असल्याची बाब वारसांनी नाकारलेली नाही. अर्जाचे स्वरूप पाहता मयत जाबदार नं. ३ यांचे वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. जरी जाबदार नं. ३ यांची मुलगी चंद्रभागा यजगर ही दि. २१.२.२००६ रोजी मयत झाली असली तरी, जाबदार नं. ३ यांचा मृत्यू तिच्या मृत्यूनंतर झाला असल्याने तिचे वारस तिचे मृत्यूनंतर अभिलेखावर घेण्याचे कोणतेच कारण नव्हते. मयत चंद्रभागा हिचे वारस अभिलेखावर घेण्यास जाबदार नं. ३ यांच्या मृत्यू नंतर कारण घडलेले आहे. जाबदार नं. ३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेल्या विलंबाचे कारण योग्य व संयुक्तीक आहे. निव्वळ अर्जदार यांनी अर्ज विलंबाने केला म्हणून अर्ज नामंजूर करणे उचित होणार नाही. तथापी अर्जदार यांनी जाणीव पूर्वक व निष्काळजीपणे प्रस्तूतचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याने अर्ज मंजूर करित असताना अर्जदार यांच्यावर खर्च लादून अर्ज मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने उचित होणार आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१) अर्ज नि. १३ व १५ मंजूर करणेत येतो.

२) अर्जदार यांनी विधी सेवा प्राधिकरण, फलटण यांच्याकडे र.रू. २००/— कॉस्ट भरण्याच्या अटीवर मयत जाबदार नं. ३ संभाजी बाबूराव बेलदार यांचे अर्जामध्ये नमूद केलेल्या वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला ४४ दिवसांचा विलंब माफ करण्यात येतो व जाबदार नं. ३ यांचे वारसांना अर्जामध्ये मयत वारस म्हणून समाविष्ठ करण्यास परवानगी देण्यात येते.

३) अर्जदार यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर वरील प्रमाणे अर्जात दुरूस्ती करावी.

फलटण
दिनांक :— ०७/०३/२०१९

**( व्ही. जे. जाधव )**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश,कनिष्ठ स्तर,
फलटण